MHNG100014202025

नि.दि.दा. क्र. ९७/२०२५
मालुताई विरुध्द डब्ल्युसीएल

## निशाणी क्र. २५ वर आदेश

अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्ज**

२. प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी त्यांना महत्वाचे दस्त अभिलेखावर दाखल करायचे असल्याने केला आहे. ते न्यायदानाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजुर करावा, अशी विनंती केली.

**खुलासा**

३. प्रतिवादी यांनी खुलासा दाखल केला नाही.

४. युक्तीवाद ऐकूण घेऊन अभिलेखाचे अवलोकन केले. दावा हा जाहीर घोषीत होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. न्यायालयाने नि.क्र. १० अन्वये मुद्दे निश्चीत केले. वादी यांचा पुरावा अभिलेखावर दाखल आहे. त्यानंतर वादी यांनी नि.क्र. २३ अन्व्ये पुरसीस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. प्रतिवादी यांनी नि.क्र २४ अन्वये त्यांचा पुरावा बंद केला. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

५. वादी यांनी दस्तावेज दाखल करण्यासाठीचे कारण हे आवश्यक आहे, असे नमुद केले आहे. दिवाणी प्रक्रिया संहीतेचे आदेश १३ यामध्ये दस्तावेज हजर करणे याबाबत नमुद आहे. वादमुद्दे निश्चीतीच्या वेळी किंवा त्यापुर्वी दस्तावेज हजर करावे, असा मानद आहे. तसेच सदरचे दस्तावेज हे साक्षीदाराच्या उलटतपासणीसाठी किंवा त्याची स्मृतीला उजाळा देण्यासाठी दाखल करु शकतात. वादी यांचा पुरावा बंद केलेला आहे. प्रतिवादी यांनी देखील त्यांचा पुरावा बंद केला आहे. अर्ज मंजुर केल्यास उभयपक्षांचे नुकसान नाही. सबब अभिलेखावरील एकंदरीत परिस्थितीवरुन मी

खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

१. वादी  यांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ वादी यांना दस्तावेज अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते.

Sd/-

**उमरेड.** **( रा.भा.डोळे )**

**दिनांक : १३.०४.२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड**